

# श्री साईलीला

जानेवारी
फेब्रुवारी
मार्च
१९५४

वर्ष ३१ वें. किरकोळ १० आणे अंक १ ल

[ स्थापना १९२१ ]

# श्रीसाईबाबांची चांदीची आंगठी



फक्त

आठ आण्यांत मिळेल.

मीन्याची आंगठी रु. १।, रु. १॥, रु. २॥ व रु. ३

प्रमाणें

व

बाबांचा मीनाकारी रंगीत फोटो पादुकासह स्टॅन्ड किंमत रु. ७ तयार मिळेल.

वि. सू:—व्यापाऱ्यांना सवलतीचे दरानें मिळेल.

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ

ठाकुरद्वार, मुंबई २.

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

साहाय्यक मंडळ

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

प्रो. गोपाळ वामन भागवत, एम्. ए.

श्री. बाळकृष्ण सखाराम पाताडे

श्री. कृष्णराव जयराम भट

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखक | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | | ७ |
| २ | प्रिय वाचक | संपादक | ८ |
| ३ | तूं माझा आधार | स्वामी रामदास | १३ |
| ४ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १४ |
| ५ | श्रीराम-कथा | स्वामी विवेकानंद | २५ |
| ६ | नाम-स्मरण | स्वामी शिवानंद | ३३ |
| ७ | रामायणाचा भारतावरील प्रभाव | पं. जवाहरलाल नेहरू | ३६ |
| ८ | कौसल्यामातेला रामाचा उपदेश | अध्यात्मरामायणांतून | ३९ |
| ९ | रामनामच कां आणि कसें घ्यावें | महात्मा गांधी | ४१ |
| १० | चिमुकल्या खारीची रामसेवा | | ४२ |
| ११ | भारतापुढील आदर्श-सीता | स्वामी विवेकानंद | ४३ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरांच्या चमत्कारांना बोपदेवांची साक्ष | खं. स. त्रिलोकेकर | ४४ |
| १३ | श्रीसाईबाबांच्या चरणीं प्रार्थना | केशवतनय | ४८ |
| १४ | अ. भा. साईभक्त संमेलन | | ४९ |
| १५ | जप करण्याचे कांहीं राममंत्र | | ५८ |
| १६ | शिरडी-वृत्त | | ५९ |
| १७ | रथयात्रा | रवींद्रनाथ ठाकोर | ६१ |


## श्रीसाईलीला मासिकासंबंधीं

* श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक दर वर्षी मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात.
* किरकोळ अंकास दहा आणे.
* वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २-४-०
* वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येतें.
* मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.
* वर्गणी मनिऑर्डरनें ' संपादक, श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १ ' या पत्त्यावर पाठवावी.
* या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.
* आलेले लेख प्रसिद्ध करणें अगर न करणें व त्यांत जरूर तो फेरबदल करणें याबद्दल सर्व हक्क संपादकांकडे आहेत.

—संपादक

# श्री साई लीला



## श्री साई वाक्सुधा

भगवंतराव क्षीरसागर नांवाचे गृहस्थ विठोबाचे उपासक होते. त्यांचे वडील पंढरपूरच्या विठोबाचे भक्त होते. वारकरी संप्रदायाप्रमाणें ते नित्यनियमानें पंढरीची वारी करीत. त्यांच्या घरांत नित्यपूजेसाठींहि विठोबाची सांवळी गोजिरवाणी मूर्ति होती. वडील वारल्यानंतर भगवंतरावांनीं आपल्या घराण्यांतील पिढीजाद कुलाचार सोडून दिला. घरच्या देव्हाऱ्यांतील विठोबाची पूजादेखील बंद केली. मग पंढरपूरची वारी तर दूरच राहिली. पुढें योगायोगानें भगवंतराव आपल्या मित्राबरोबर सहज शिरडीला गेले. त्यांना पाहतांच बाबा म्हणाले,

'अरे तुझ्या वडिलांना मीं चांगला ओळखतों. ते माझे परममित्र होते. म्हणूनच मीं तुला मुद्दाम येथें खेंचून आणलें. तुला ही कसली अवदसा आठवली आहे ? तुझ्या घरच्या सांवळ्या विठ्ठलाची पूजाअर्चा सोडून दिलीस. नुसता रोजचा नैवेद्य देखील दाखवीत नाहींस. परमपवित्र भगवानाला व मला उपाशीं ठेवून तुझें कल्याण होईल काय ? नीट विचार कर. आपल्या ओढाळ मनाला आवरून वाडवडीलांनीं घालून दिलेला कुलाचार पुन्हां सुरू कर आणि विठ्ठलाची मनोभावें पूजा करण्यास या क्षणापासून पुन्हां सुरुवात कर.'

— **श्रीसाईलीलामृत** (पृष्ठ ८७)

# –प्रिय वाचक–

या अंकापासून ‘ श्रीसाईलीला ’ त्रैमासिक एकतिसाव्या वर्षांत पदार्पण करीत आहे. गतवर्षी त्रैमासिकाच्या संपादनाची जबाबदारी मीं माझ्या शिरावर घेतली तेव्हां आपल्या हातून हें कार्य कसें काय पार पडेल याची मला धाकधुक वाटत होती. परंतु बाबांची कृपा आणि साईभक्त स्नेह्यांचें साहाय्य यांमुळें गेल्या वर्षाचे चारहि अंक सरस निघाले. अनेक वाचकांनीं पत्रें पाठवून साईलीलेचें अंतरंग व बहिरंग यांबद्दल कौतुक व्यक्त केलें. ‘ लीले ’ चें स्वरूप केवळ सांप्रदायिक ठशाचें न राहतां, साईबाबांचें स्वतःचें जीवन आणि तत्त्वज्ञान यांना अनुसरून तें सर्वसमावेशक स्वरूपाचें असावें अशी दक्षता कटाक्षानें घेण्याचा मीं प्रयत्न केला आहे. चालू अंक हा ‘ रामनवमी विशेषांक ’ आहे. श्रीरामचंद्राचें चरित्रकथन हें सूत्र कायम राखून विषयांची विविधता, मनोरमता आणि उद्‌बोधकता हीं कायम ठेवण्याची कोशीस मीं केली आहे. वाचकांना हा अंक आवडावा आणि संग्राह्य वाटावा असा करण्याचा प्रयत्न मीं केला आहे. मागील सर्व अंकांप्रमाणें याचेंहि वाचक सानंद स्वागत करतील अशी मला आशा आहे.

× × ×

ता. २३ ते २६ जानेवारीपर्यंत चार दिवस अ. भा. साईभक्त संमेलन मुंबईला थाटामाटानें साजरें झालें. डॉ. आंबेडकर, केंद्रीय गृहखात्याचे उपमंत्री श्री. दातार, रामकृष्ण मिशनच्या खार येथील मठाचे प्रमुख स्वामी संबुद्धानंद, मुंबईचे मुख्यमंत्री ना. मोरारजी देसाई, महसूलमंत्री ना. भाऊसाहेब हिरे, प्रा. ए. आर्. वाडिया, संत तुकडोजीमहाराज, संत श्रीगाडगेमहाराज इत्यादि थोर थोर व्यक्तींनीं या संमेलनांत भाग घेतला होता. भारतीय कीर्तीचे गायक, गायिका आणि कलावंत यांनीं साईभक्तीनें प्रेरित होऊन या संमेलनांत भजन–गायनादि कार्यक्रम केले. हजारों लोक संमेलनांतील व्याख्यान–भजनादि कार्यक्रमांना हजर राहिले. संमेलनाला जोडूनच श्रीसाईबाबांचें जीवन–दर्शन घडविणारें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. तेंहि अगणित लोकांनीं पाहिलें. संमेलनाच्या चार दिवसांत भजन, पूजन, आरती, पारायण इत्यादि कार्यक्रमहि झाले. चार दिवस श्रीसाईबाबांच्या नामसंकीर्तनानें मुंबईचें वातावरण दुमदुमून गेलें. ‘ लोकमान्या ’सारख्या वजनदार दैनिकानें संमेलन–विशेषांक काढून श्रीसाईबाबांचा अमृतसंदेश महाराष्ट्रांत घरोघर पोंचविला. साईबाबांच्या चमत्कारसामर्थ्यावर ज्यांची श्रद्धा नाहीं त्यांनीं या अवचित चमत्काराचें थोडें मनन करावें.

× × ×

या संमेलनाच्या निमित्तानें भक्तीचा गुलाल उधळला तशीच टीकेचीहि धूळ उडाली. संमेलन होण्यापूर्वी आणि झाल्यानंतर कित्येक दिवस, विविध नियतकालिकांतून श्रीसाईबाबा आणि संमेलन या दोहोंवर अनेक प्रकारचे अनेक दोषारोप करण्यांत आले आहेत. 'हजारों रुपये खर्चून व लाखों लोकांचा समुदाय जमवून हा जो 'तमाशा' संमेलन-चालकांनीं घडवून आणला त्याची नेमकी फलश्रुति काय ?' असा कडवट प्रश्न, आंबट चेहरा करून अनेक टीकाकारांनीं केला आहे. या प्रश्नाचें उत्तर असें कीं, साईबाबांविषयीं कुतूहल जागृत करणें आणि त्यांचें जीवन व तत्त्वज्ञान समजून घेण्याची जिज्ञासा लोकांमध्यें निर्माण करणें हा एक मोठा हेतु या संमेलनानें साध्य झाला आहे. संमेलनानें साईबाबांचा गाजावाजाच तेवढा खूप केला; पण प्रत्यक्ष विधायक व नित्य स्वरूपाचें काडीमात्र कार्य त्यानें साधलें नाहीं, असा कांहीं टीकाकारांचा आरोप आहे. वस्तुतः हा आरोप नसून खऱ्या कार्याचें तें बरोबर वर्णन आहे. 'गाजावाजा करणें' आणि साईबाबांकडे लोकांचें लक्ष वेधून घेणें हेंच संमेलनाचें प्रत्यक्ष आणि विधायक कार्य आहे. साईभक्तांचें अखिल भारतीय स्वरूपाचें हें पहिलेंच संमेलन. या पहिल्याच संमेलनांत साईबाबांच्या नामसंकीर्तनाचा इतका जयघोष झाला हेंच त्याचें मोठें यश आहे. साईभक्तांना कृतकृत्यता वाटावी अशीच ही घटना आहे.

× × ×

ज्या साईबाबांचा तुम्हीं एवढा मोठा गाजावाजा चालविला आहे त्यांनीं एवढी काय कामगिरी आपल्या जीवनांत करून दाखविली ? त्यांनीं समाजकल्याणाचें कसलें कार्य केलें ? असा प्रश्न अनेकांनीं विचारला आहे. हा प्रश्न जेव्हां केला जातो तेव्हां साईबाबांनीं समाजहिताचें कांहींहि कार्य केलेलें नाहीं असा ध्वनि त्या प्रश्नांतच अभिप्रेत असतो. पण कोणत्या कार्याला 'समाजहिताचें कार्य' असें म्हणायचें ? श्रीरामकृष्णपरमहंस, श्रीरमणमहर्षि, श्रीअरविंद या अवतारी विभूति आपापलें निवासस्थान सोडून 'समाजकार्य' करीत कधीं फिरल्या नाहींत. एकाच ठिकाणीं वर्षानुवर्षें राहून अनासक्त जीवन ते जगले आणि आपापल्या साक्षात्काराप्रमाणें त्यांनीं लोकांना धर्मोपदेश केला. या विभूतींनीं समाजकार्य केलें असें आपण समजतां का ? मग तें साईबाबांनींहि केलें आहे. कामिनी-कांचनाची आसक्ति संपूर्णतः नष्ट करून विरागी जीवन ते जगले. त्यांच्याकडे जीं जीं माणसें आलीं त्यांनीं जेव्हां जेव्हां आपलीं दुःखें बाबांना सांगितलीं आणि त्यांची करुणा भाकली तेव्हां तेव्हां त्यांचीं तीं दुःखें नष्ट अथवा सुसह्य करण्याची कृपा बाबांनीं दाखविली. शुद्ध धार्मिक जीवनाचा प्रत्यक्ष आचरणानें दिलेला वस्तुपाठ आणि दुःखितांचे अश्रू पुसण्यासाठीं सदैव सिद्धता, ह्या साईबाबांच्या जीवनांत आढळून येणाऱ्या गोष्टी म्हणजे समाज-कार्य नव्हे का ?

× × ×

एकदां टीका करण्याचा चंग बांधला म्हणजे असा माणूस आपल्या टीकेच्या ओघांत किती वाहात जातो आणि कांहींहि आधार पाहाण्याची यत्किंचित् पर्वा न करतां किती गर्ह्य दोषारोप करीत सुटतो, याचीं गंमतीदार उदाहरणें कांहीं नियतकालिकांतून

आढळून आलीं आहेत. हिंदुधर्माचा कट्टर अभिमान बाळगणाऱ्या एका नियतकालिकांत, साईबाबांच्या चमत्कार–कथा कशा बाष्कळ आहेत हें दाखविण्यासाठीं एक गोष्ट दिली आहे. एका माणसावर लांचलुचपतीच्या आरोपावर खटला सुरू झाला होता. या माणसाची साईबाबांवर बिलकुल श्रद्धा नव्हती. पण 'साईबाबा तुला संकटांतून सोडवितील' असें सांगून एका स्नेह्यानें त्याला शिर्डीस नेलें. साईबाबांनीं असें सांगितलें म्हणे कीं, 'साप जवळून जाईल पण दंश होणार नाहीं.' या 'गुळमुळीत' उत्तरानें या लांचखोराचें समाधान झालें नव्हतें. पुढें त्याच्या खटल्याचा निकाल लागून त्याला सात आठ वर्षांची शिक्षा झाली. तेव्हां या नियतकालिकांत ही गोष्ट देऊन विचारलें आहे कीं, 'हा असला कसला साईबाबा ?' साईबाबांवर ज्याची काडीमात्र श्रद्धा नाहीं, लांच घेतल्याचा ज्याला पश्चात्ताप झालेला नाहीं, अशा माणसाला लांचखोरीबद्दल शिक्षा होऊं देणें हा साईबाबांचा केवढा अपराध ! त्यांच्या चमत्कार–सामर्थ्याला आणि साधुत्वाला हा केवढा मोठा डाग ! खरोखरी साईबाबांवर असे आरोप जेव्हां गंभीरपणें केले जातात तेव्हां त्यांना उत्तर तरी काय देणार ? माणसें आरोप करतां करतां कोणत्या थराला जातात याचें उदाहरण देण्यासाठींच केवळ ही गंमत वाचकांना सांगितली आहे.

× × ×

आणखी एक मजेदार उदाहरण पहा. अलीकडे साईबाबांच्या नांवावर जी वेडगळ पत्रांची सांखळी कांहीं वेड्यापिरांनीं चालू केली आहे, तीविषयीं साईलीलेंत मीं दोनदां लिहिलें होतें. 'द्वारकामाई' या साप्ताहिकांत आणि 'लोकमान्य' दैनिकांत माझे ते उद्‌गार उद्‌धृत करण्यांत आले होते. तरीहि मुंबईच्या एका लोकप्रिय साप्ताहिकाच्या संपादकांनीं आपल्या संपादकीय लेखांत असा आरोप केला होता कीं, साईभक्त संमेलनाची जाहिरात व्हावी म्हणूनच ही पत्रांची सांखळी सुरू करण्यांत आली होती ! या संपादकांचा असाहि शोध आहे, कीं, संमेलनाची आगाऊ 'तयारी' म्हणून अनेक साईभक्तांच्या घरीं साईबाबांचीं पावलें उमटल्याचे वृत्तांत जाणून बुजून पसरविण्यांत आले होते ! साईभक्त–समुदाय म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं निघालेली सोनेरी टोळी, असा या संपादकांचा प्रामाणिक समज असावा ! असो ! त्यांत समाधान एवढेंच कीं, स्वामी संबुद्धानंद, श्री गाडगेमहाराज, श्री तुकडोजीमहाराज यांसारखे साधुसंत आमच्या या 'टोळींत' सामील आहेत ! एका टीकाकारानें सात्विक संतापानें असाहि प्रश्न विचारला होता, कीं भारतांतील सर्व इतर संस्थानें नामशेष करून टाकण्यांत आलीं असतां साईबाबांचें 'शिरडी संस्थान' तेवढें नेहरूंनीं काय म्हणून कायम ठेवलें ? हें संस्थान टिकविण्यामागें नेहरूंचा मुसलमानधार्जिणेपणा असावा असाहि कित्येकांना दाट संशय आहे ! संघटित देवस्थानाला संस्थान म्हणण्याची प्रथा असते, इतकेंहि या टीकाकारांना माहीत नसावें ना ! या टीका ऐकल्या म्हणजे 'शिव ! शिव !' म्हणण्याखेरीज अथवा खळखळून हंसण्याखेरीज दुसरें उत्तर काय द्यायचें ?

× × ×

मूर्तिपूजा, साधुसंतांची पूजा या गोष्टी 'मानवी मनाची अत्यंत खालावलेली अवस्था' दर्शवितात, असें डॉ. आंबेडकर हे संमेलनाच्या उद्घाटनाचें भाषण करतांना म्हणाले होते! याविषयीं मी पुन्हां केव्हांतरी लिहीन. पण एवढें सांगणें अवश्य आहे कीं, मूर्तिपूजेबाबत ख्रिस्ती मिशनऱ्यांचें जितपत ज्ञान आहे तितपतच डॉ. आंबेडकरांची समजूत असावी हें पाहून सखेदाश्चर्य वाटतें. 'संतांच्या नांवें आपण पैसा जमविला असल्यास त्याचा विनियोग सत्पात्रीं व्हावा, बहुसंख्य जनतेचें दुःख नष्ट करण्याकडे त्याचा उपयोग करावा,' असा सल्ला डॉ. आंबेडकरांनीं आपल्या भाषणांत दिला आहे. या सल्ल्यांत जी खोंच आहे तिची दखल घेणें अवश्य आहे. शिर्डीला येणाऱ्या हजारों यात्रेकरूंकडून जो पैसा गोळा होतो त्याचें काय होत असावें याबद्दल अनेक लोकांना चिंता लागून राहिली असल्याचें दिसतें. त्यांच्या माहितीसाठीं हें सांगणें अवश्य आहे कीं, शिर्डी येथील विविध पवित्र स्थानें नीट ठेवण्याकडे, यात्रेकरूंची सर्वतोपरी सोय व्हावी याची व्यवस्था करण्याकडे आणि भजन–पूजन–प्रवचन–कीर्तन इत्यादि कार्यक्रम यथासांग नित्य पार पाडण्याकडे या पैशाचा खर्च होतो. एवढेंच कार्य करून जरी शिर्डी संस्थानचें विश्वस्त मंडळ व कार्यकारी मंडळ स्वस्थ राहिलें असतें तरीहि त्याच्यावर कर्तव्यच्युतीचा आरोप करतां आला नसता. एक पवित्र देवस्थान व्यवस्थित चालविणें हेंच या मंडळाचें आद्यकर्तव्य आहे व तें कर्तव्य तें बिनचुकार पार पाडीत आहे. परंतु हें व्यवस्थापकमंडळ एवढ्यावर संतुष्ट राहिलेलें नाहीं. दुःखितांचे अश्रू पुसणें, संकटग्रस्तांच्या मदतीला धांवून जाणें हें बाबांचें जीवनकार्य होतें. तें बाबांच्या चरणांशीं येणाऱ्या पैशांतून यथाशक्ति पुढें चालविण्याचें कार्य हें मंडळ करीत आहे. मी प्रत्यक्ष कांहीं आंकडेच देतों म्हणजे अधिक शाब्दिक विवेचनाची गरज उरणार नाहीं. अलीकडच्याच कांहीं काळांत शिर्डी संस्थानकडून संकटग्रस्तांसाठीं पुढीलप्रमाणें आर्थिक साहाय्य देण्यांत आलें आहे—

| | रुपये |
|---|---|
| महात्मा गांधी निधी | १००१ |
| शेतकरी परिषद | १००० |
| शिरडी येथील शालागृह | ४००० |
| नगर जिल्हा दुष्काळ फंड | ५००१ |
| मद्रास रिलीफ फंड | २००० |
| रामदास बोट बुडाली तेव्हां उतारूंच्या कुटुंबांना मदत | ९०० |
| कोंकण रिलीफ फंड | ७०१ |
| अहमदनगर ( राहुरी ) रिलीफ फंड | २००० |

शिरडीला संस्थाननें एक धर्मार्थ दवाखाना चालविला आहे. त्यांत किती रोग्यांना मोफत उपचार करण्यांत आले त्याचे कांहीं आंकडे—

| वर्ष | उपचार झालेल्या रोग्यांची संख्या |
|---|---|
| १९५० | १२८२४ |
| १९५१ | १८४६४ |
| १९५२ | २२७६४ |
| १९५३ | २८८०८ |

या आंकडेवार माहितीनें टीकाकारांचें थोडेंफार समाधान व्हावें.

× × ×

संस्थानच्या विश्वस्तमंडळानें व कार्यकारिणीनें चालविलेल्या कार्याचें आणि साईबाबांच्या विभूतिमत्त्वाचें अधिक विवेचन मी करीत नाहीं. पण इथें एक गोष्ट सांगण्याचा मोह मला आवरत नाहीं. स्वामी विवेकानंद अमेरिकेंत वेदान्तधर्मावर व्याख्यानें देत फिरूं लागले, तेव्हां साहजिकच खिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्या मिशनऱ्यांच्या पोटांत भीतीचा गोळा उठला. त्यांनीं व्याख्यानांतून आणि वृत्तपत्रांतून हिंदु लोकांची व हिंदुधर्माची नाना प्रकारें नालस्ती करण्यास सुरुवात केली. एकदां एका मोठ्या सभेपुढें भाषण करीत असतां स्वामी विवेकानंदांनीं श्रोत्यांना प्रश्न केला, ‘ या सभेंत ज्या कोणी हिंदु लोक व हिंदु धर्म यांचा चांगला अभ्यास केलेला असेल, त्यांची थोडीबहुत तरी माहिती मिळविली असेल, असे कोण आहेत ? त्यांनीं हात वर करावे.’ हजारों श्रोत्यांच्या त्या सभेंत एखाद दुसराच हात वर झाला. स्वामीजी त्यावर हंसून म्हणाले, ‘ आणि तरीहि हिंदूंवर व त्यांच्या धर्मावर वाटेल तशी टीका करण्याचें व अशी बेजबाबदार टीका खरी मानण्याचें साहस तुमच्यानें करवतें ना ? ’

या गोष्टीचें तात्पर्य सांगण्याची कांहीं गरज आहे का ?

—संपादक

***

* कमलकंदा आणि दर्दुरी । दोघा नांदणूक एकेचि घरीं ।
परी पराग सेविजे भ्रमरीं । येरा चिखुलचि उरे ॥

—ज्ञानेश्वरी-ओंवी ५९ अ. ९

# तूं माझा आधार

तूं माझा आधार । रामा ! तूं एकच आधार ॥

घेत आसरा तुझियामध्यें रामा तूं भवसार हो । रामा तूं भवतार हो ।
तूं मम प्रीती, तूं मम जीवन, तूं नेता साचार हो । तूं माझा आधार ॥
मी त्वद्रूपीं तूं मद्रूपीं मायपिता दातार हो । मायपिता दातार हो ।
जीवन तूं जगताचें, केवळ तूंच जगाचें सार हो । तूं माझा आधार ॥
विश्वांतिल या चराचराचा वेशी तूं भरिभार हो । वेशी तूं भरिभार हो ।
श्रेष्ठकनिष्ठीं जीवन तूं मम बंधुमित्रपरिवार हो । तूं माझा आधार ॥
संतत चिंतन चरणांबुजिं तव, माझा हा निर्धार हो ।
माझा हा निर्धार हो ।
स्वप्निं दिसावें दिव्य तेज तव जाळि मना अंगार हो । तूं माझा आधार ॥
सेवा घडते प्रतिदिन तुमची हाच सुखाचा भार हो ।
हाच सुखाचा भार हो ।
दौलत लौकिक एकच तूं मम, तूंच यशाचा हार हो । तूं माझा आधार ॥
मृदुल मधुर किति रामनामजप जणुं सौख्यामृतधार हो ।
जणुं सौख्यामृतधार हो ।
राम स्मरावा राम जपावा छंद असो अनिवार हो । तूं माझा आधार ॥

कवि—**श्रीस्वामी रामदास** अनुवादक—**द. पां. खांबेटे**




संकलक:—आमचे प्रतिनिधि

## १ उदीचा प्रभाव

**श्री.** आर. एच. होंगल (प्राथमिक शिक्षक, के. बी. स्कूल, बैल–होंगल, जिल्हा बेळगांव) यांनीं ता. १३–११–५३ रोजीं खालील अनुभव सांगितला—

'मी आज माझ्या दोन महिन्याच्या मुलीस बाबांचे दर्शनास घेऊन आलों आहें. ती जगेल याची आम्हांस खात्री नव्हती. माझी बायको प्रसूतिगृहांतच बाळंतीण झाली. ही मुलगी (नांव–गंगुताई) अगदीं अशक्त निपजली. दुसरे दिवसापासून तिला ताप येऊं लागला आणि तिसरे दिवशीं सकाळींच आणखी जास्त ताप चढला. तेव्हां मीं डॉक्टरांना म्हटलें, तिला कांहीं औषध द्या. ते म्हणाले, एवढया लहान मुलीला औषध काय द्यावयाचें ? व त्यांनीं औषध दिलें नाहीं. मुलीचा ताप वाढतच चालला व जीव कासावीस व्हावयास लागला. तेव्हां मजजवळ बाबांची उदी होती ती तिला मीं पाण्यांत अगदीं थोडीशीच कालवून पाजली व थोडी कपाळास लावली. नंतर बाबांचें नामस्मरण चालू ठेवलें. त्याच संध्याकाळीं तिचा ताप अजिबात गेला. आतां ती चांगली गुटगुटीत झाली आहे. ही बाबांचीच कृपा समजून आज आम्ही त्यांचे दर्शनास आलों आहों.'

★

## २ बाबांनीं एकोपा घडवून आणला

**श्री.** रणछोडलाल चुन्नीलाल भगत (घर नं. १२, नवी पेठ, जळगांव, पूर्व खानदेश) यांनीं ता. १५–११–५३ रोजीं खालील अनुभव सांगितले—

'१९५२ च्या ऑक्टोबर महिन्यांत मी पहिल्या प्रथमच शिर्डीस बाबांचे दर्शनास आलों. मन प्रसन्न झालें व बाबांवर अत्यंत भक्ति बसली. या सुमारास माझ्या थोरल्या भावाची व माझी एकी व्हावी व दोघांहि कुटुंबांत एकोपा वाढावा असें मला अत्यंत तीव्रतेनें वाटत होतें. थोडीथोडकीं नव्हे तर जवळजवळ ३५ वर्षें त्याच्यांत आणि माझ्यांत वैमनस्य होतें आणि या प्रदीर्घ काळांत एकी घडवून येण्यासाठीं मीं ७।८ वेळां तरी प्रयत्न केला असेल. पण माझ्या कोणत्याहि प्रयत्नांस आतांपर्यंत एकदांहि यश आलें नाहीं. हल्लीं हल्लीं ह्या गोष्टीचें अत्यंत वाईट वाटे. पण हा एकोपा घडून कसा येणार ? साईबाबांची माहिती झाली होतीच व शिर्डीसहि मी नुकताच जाऊन आलों होतों. आतां बाबांवरच सर्व भार टाकल्यास तेच हा एकोपा घडवून आणतील, एरवीं ही शक्य कोटींतील गोष्ट नव्हे,

असे मनांत विचार येऊं लागले. म्हणून स्वतःच्या कुटुंबासह १९५२ च्या दत्तजयंतीला मी पुन्हां शिर्डीस आलों. बाबांना अभिषेक वगैरे करून त्यांच्यापुढें अत्यंत नम्रतापूर्वक प्रार्थना केली कीं, 'बाबा, आतां आमच्या थोरल्या बंधूंत व माझ्यांत एकोपा घडवून आणा हीच आज माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे व ती तुम्हीच तृप्त कराल.' नंतर आम्हीं परत गेलों. काय आश्चर्य, बाबांचे कृपेनें मार्च १९५३ मध्यें आमचा दोघांचा सलोखा झाला व आज त्या एकोप्याचें सुख आम्हीं समाधानानें भोगीत आहोंत.'

★

## ३ तुपाच्या डब्यांत बाबांचीं पावलें

**श्री.** श्रीनिवास नारायण प्रधान (धंदा :–नोकरी, इंडियन एअर लाईन्स, सांताक्रूझ; राहण्याचा पत्ता :—जयराम–निवास, ७ वा रस्ता, खार, पश्चिम रेल्वे) यांनीं ता. २०–११–५३ रोजीं खालील अनुभव सांगितला—

'बाबांची माहिती व भक्ति मला बरेच दिवसांपासून आहे. परंतु त्यांच्या कृपेच्या साक्षात् अनुभवाचा योग अद्यापपर्यंत आला नव्हता. उलट आर्थिक व इतर कौटुंबिक संकटांमुळें व अडचणींमुळें आम्हीं अगदीं रंजीस आलों होतों; व त्यामुळें असें वाटे कीं, बाबांची आपणावर अवकृपाच आहे. तेव्हां यांतून काय मार्ग काढावा, बाबांची भक्ति कशी करावी, असा विचार करीत असतां 'श्रीसाईसच्चरित' या प्रासादिक ग्रंथाचे आम्हीं दोघांनीं, जसें जमेल तसें, रोज १ कींवा २ अध्याय वाचावेत अशी कल्पना सुचली. माझी पत्नीहि या गोष्टीस कबूल झाली व मग आम्हीं रोज अध्याय वाचण्यास सुरवात केली. माझे २०–२५ अध्याय वाचून झाले व पत्नीचे १७–१८; पण आम्हांस बाबांच्या कृपेची कांहींच प्रचीती आली नाहीं. त्यांच्या दर्शनास शिर्डीस जावें असें वाटे; पण तीहि गोष्ट आजारीपणामुळें व इतर कांहीं कारणांमुळें जमून आली नव्हती. मी अत्यंत निराश झालों आणि बाबांना प्रार्थून म्हटलें, 'बाबा, निदान आपला आधार मला आहे याचेबद्दल कांहींतरी प्रचीती दाखवा व शिर्डीस आपले दर्शनास मला न्या.' सहज मी म्हणूं लागलों, 'आतां कशास्तव बोलूं फार। तूंच माझा आधार। शिशु मातेच्या कडेवर। असल्या निर्भय सहजची॥' नंतर आम्ही बाबांच्याच गोष्टी बोलत झोंपीं गेलों. त्या दिवशीं सोमवार होता.

'दुसऱ्या दिवसाची म्हणजे मंगळवार ता. १०।११।५३ ची गोष्ट. सकाळींच उठल्याबरोबर मी पत्नीस म्हणालों, 'मला असें वाटतें कीं, बाबा आपणास नक्कीच याच महिन्यांत शिर्डीस नेतील.' पुढें आम्ही रोजच्यासारखे कार्यक्रम उरकले. १०-१०॥ चे सुमारास जेवणाची वेळ झाली आणि त्यावेळेस माझी पत्नी पोळ्या करीत होती. पोळ्यांला लावण्यासाठीं तुपाचा डबा काढण्याकरितां रॅककडे गेली. इतर बायकांप्रमाणेंच तिलाहि संवय होती कीं, तुपाचा डबा खालीं काढायचा, स्टोव्हजवळ ठेवायचा व मग प्रत्यक्ष पोळ्या तयार झाल्यावर किंवा त्या सुमारास तो उघडून तूप लावावयाचें. पण त्यावेळेस तिला काय बुद्धि झाली कोणास ठाऊक ? तिनें रॅकवरून डबा काढला आणि झांकण उघडलें, आणि आंतील दृश्य पाहतांच तिनें अचंब्यानें मला हांक मारली. मी

धांवतच गेलों आणि डबा पाहतों तों मीहि आश्चर्यानें दिङ्मूढच झालों. कारण त्यांत २ पाउलें उमटलेलीं स्पष्ट दिसत होतीं. तूप थिजलेलें होतें आणि वरच लहान अशीं दोन पाउलें रोवल्यासारखीं किंवा दाब पडल्यासारखीं उमटलेलीं होतीं. एक पाऊल सरळ उभें होतें ( डावें पाऊल ) व दुसरें आडवें ( डाव्या पाउलाच्या बोटाजवळील जागेवर ) अर्धवट उमटलेलें होतें. तुपाचा डबा स्टेनलेस स्टीलचा असून मुलें शाळेंत खाऊ नेण्यासाठीं जो डबा वापरतात त्या आकाराचा ( म्ह. लांबी साधारण ४''व उंची २$\frac{3}{4}$'' ) आहे. डब्यास झांकण असतांना हें पाऊल कसें उमटलें याचें आम्हीं आश्चर्य करीत राहिलों. पाउलांची लांबी साधारण ३॥'' × $\frac{3}{4}$'' आहे. हें बाबांचेंच पाऊल आहे असें आम्हांस वाटूं लागलें व ' माझा तुला आधार आहे, तूं घाबरतोस कशाला ' हें बाबांनीं या रूपानें दाखविलें असें आम्हांस खात्रीपूर्वक वाटतें. दुसरें असें कीं आम्ही याबाबत गोष्टी बोलत असतां आमची धांदल व गडबड पाहून आमच्या शेजारच्या श्री. सुधाकर भट यांच्या मातोश्री आमचेकडे आल्या आणि डब्यांतील पाउलांकडे पाहून व सर्व हकीगत ऐकून आणि आमच्या घरांतील बाबांच्या फोटोकडे पाहून म्हणाल्या कीं, हें बाबांचेंच पाऊल असलें पाहिजे. ह्या अत्यंत नास्तिक मताच्या आहेत. त्या म्हणाल्या, ' मला आज सकाळींच एक स्वप्न पडलें. फोटोंतील भिकारी स्वप्नांत माझ्या उशाशीं आला आणि डोक्यावरून हात फिरवूं लागला. मीं स्वप्नांतच त्यास झिडकारला आणि त्याला घालवण्यासाठीं म्हणून अंथरुणांतून उठतें तों मी खडबडून जागी झालें.' यावरून असें वाटतें कीं, त्यानंतर साईबाबा आमचेकडे आले असावेत.

' असो. या डब्याची पुढें आम्ही फार काळजी घेतली. थंडी असल्यामुळें तूप वितळलें नाहीं व पाउलें तशींच राहिलीं. त्यांची पूजाअर्चा केली व श्रीसाईसच्चरिताचे इतर उरलेले सर्व अध्याय आम्हीं उभयतांनीं संपवून शिर्डीस गुरुवार ता. १९।११।५३ रोजीं आलों. कोणतेंहि संकट आलें नाहीं. अत्यंत श्रद्धापूर्वक भावनेनें तुपांत बाबांचें पाऊल उमटलेला हा डबा त्यांचे समाधीस दाखविला ( ता. २०।११।५३ रोजीं ). व त्यावर विधिपूर्वक अभिषेक केला. अभिषेकाचे मंत्र श्री. विठ्ठलराव मराठे यांनीं सांगितले.'

★

## ४ बाबांच्या कृपेनें मूल वांचलें

माटुंग्याच्या एका मद्रासी साईभक्तांनीं तारीख १२–१२–१९५३ रोजीं खालील अनुभव सांगितले—

' मला साईबाबांची प्रथम माहिती झाली ती १९४४ सालमध्यें. बाळंतपणासाठीं म्हणून मीं माझ्या बायकोस प्रसूति–गृहांत दाखल केलें. तिला ७ वा महिना होता आणि प्रसूति–वेदना असह्य होत होत्या. मूल नैसर्गिक रीत्या बाहेरच येईना. नाना प्रकारचीं औषधें दिलीं. शेवटीं मुलाचा उजवा पायच थोडासा बाहेर आला. म्हणजे मूल पायाळू म्हणून जन्माला येणार हें स्पष्ट झालें. पण पाय बाहेर येऊन बराच वेळ गेला तरी बाकीचें शरीर बाहेर येईना. शेवटीं डॉक्टरांनीं पाय आंतमध्यें जाऊं नये म्हणून पायाला वजन

बांधलें. दोन दिवस हा त्रास झाला. शेवटीं डॉक्टरांनीं ऑपरेशन करण्याचें ठरविलें. अशा स्थितींत तिसरे दिवशीं माझ्या बायकोच्या चुलतबहिणीनें आपल्या बहिणीस म्हटलें कीं, तूं साईबाबांची प्रार्थना कर. (ह्या चुलतबहिणीस साईबाबांची माहिती होती.) परिस्थिती अशी होती कीं, प्रत्यक्ष मृत्यूशीं झगडा. अशा परिस्थितींत साईबाबांचें नांव सहज सुचविलें गेलें. तेव्हां बुडत्याला काडीचा आधार म्हणा – माझ्या बायकोनें बाबांचें सारखें स्मरण चालविलें आणि केवळ बाबांच्याच कृपेनें माझी बायको त्यानंतर अवघ्या ५ तासांत सुखरूप बाळंतीण झाली. ऑपरेशनची जरूरच पडली नाहीं. त्यावेळेस झालेला मुलगा फक्त ५ पौंडांचा होता व जवळ जवळ ३ महिने रडतसुद्धां नव्हता. पण बाबांच्या कृपेनें आज तो हयात असून त्याची प्रकृतीहि चांगली आहे. ह्या वेळेपासूनच आम्हांस बाबांची माहिती झाली; आणि झाली ती अशा रीतीनें कीं, त्यांच्या लीलेचा आम्हांस ताबडतोब प्रत्यय येऊन त्यांच्यावर आमची दृढ श्रद्धा बसली.'

★

## ५ लेटर–रायटरला आलेला अनुभव

श्री. उत्तम नरहर शिराळकर (लेटर–रायटर, शाहुपुरी, पोष्ट कोल्हापूर; राहण्याचा पत्ता–१३८५, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर) यांनीं ता.१३–११–५३ च्या पत्रद्वारें आपला खालील अनुभव कळविला आहे—

'मी शाहुपुरी पोष्टांत लेटर–रायटर म्हणून काम करीत असून त्या धंद्यावर मला जें काय मिळतें त्यावरच माझें संपूर्ण जीवित अवलंबून आहे. पदरीं पत्नी व एक लहान मूल असून मोठ्या कष्टानें जीवन कंठीत आहें. ह्या रायटरशिपच्या कामांत मला सरासरी रोजीं १ रु. ते १। प्राप्ती होते. एखादे दिवशीं कांहीं मिळालें नाहीं किंवा कमी प्राप्ती झाली म्हणजे उपाशी राहण्याची सुद्धां पाळी येते.

'ता. २५।८।५३ ची गोष्ट. मी पोष्टांत माझ्या जागेवर रोजच्याप्रमाणें बसलों. २ वाजून गेले तरी मला कांहींच काम मिळालें नाहीं व त्यामुळें अर्थात् प्राप्तीहि कांहींच नाहीं. मनामध्यें बाबांचा धांवा केला व त्यांना करुण वाणीनें प्रार्थिलें. इतक्यांत एक मनीऑर्डर फॉर्म लिहिण्यास गिऱ्हाईक आलें. आणि साईकृपा ती हीच कीं, ती मनीऑर्डर शिरडीलाच करावयाची होती. यशवंत बापूजी वैराळ, राजारामपुरी, कोल्हापूर, या मनुष्याची ती मनीऑर्डर होती. जणूं काय माझें संकट हरण करण्यासाठीं बाबांनीं हा दृष्टांत घडवून आणला असें मला वाटलें. तेव्हांपासून मला बाबांच्याबद्दल जास्त भक्ति वाटूं लागली. जणूं कांहीं त्यांनीं मला सांगितलें कीं, 'बाबा रे भिऊं नकोस, मी तुझ्या पाठीशीं आहें.' तो फॉर्म लिहून झाल्यानंतर मला त्या दिवशीं एकंदर १॥ रु.चें काम अगदीं अनपेक्षित रीत्या मिळालें. त्या दिवसापासून मीं माझ्या सर्वस्वाचा आणि कुटुंबीयांचा भार बाबांच्यावर टाकला आहे. त्या दिवशीं अगदीं प्रथमच मीं बाबांच्या प्रतिमेचें एक चित्र विकत घेतलें आणि घरीं नेऊन लाविलें. आतां मी त्यांचें रोज भक्तिभावानें दर्शन घेत असतों.'



★

## ६ गरीब शेतकऱ्यावर बाबांची कृपा

बाबांची भक्ति जडल्यापासून आपलें कसें कल्याण होत गेलें, याबद्दलचे अनुभव श्री. नारायण दगडू चव्हाण ( मु. जातेगांव खुर्द, पोष्ट तळेगांव–ढमढेरे, तालुका शिरूर, जिल्हा पुणें ) यांनीं ता. १९–११–५३ च्या पत्रद्वारें जे कळविले ते खालीं दिले आहेत—

'मी एक गरीब शेतकरी आहें. मला नेहमीं कांहीं ना कांहीं दुखणें असे. पुष्कळ प्रयत्न केले, पण मला कांहीं गुण येईना. असाच एकदां सहज मी एका मित्राकडे गेलों असतां मला त्यांनीं साईबाबांची माहिती सांगितली. तेव्हां एकदां बाबांचें दर्शन घेऊन यावें असें ठरवून मीं शिरडीस येऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेतलें. त्यानंतर फोटो वगैरे घेऊन मी परतलों. तेव्हांपासून मला बरेंच वाटलें व माझें दुखणें पळालें. त्यांच्या फोटोची मनापासून सेवा करतों व गुरुवार धरतों. शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घडल्यामुळें माझें दुखणें पळालें यांत मला तिळमात्र संशय वाटत नाहीं.

'दुसरा अनुभव म्हणजे मी माझी मोट हांकीत असतां माझ्या मोटेचा नाडा व सैंदर तुटला व माझा हात हाडांत गुंतला असतां माझे डोळे झांकले व मी आतां मरतों असा भास झाला. पण कसा त्यांतून सुखरूप पार पडलों तें बाबांनाच माहीत! बाबांचे कृपेनें मला धक्का सुद्धां लागला नाहीं. तिसरा अनुभव म्हणजे आमच्या घरांत जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नव्हती. उत्पन्नापेक्षां खर्च जास्त, त्यामुळें घरांत सगळ्या वस्तूंची नेहमींच टंचाई. पण बाबांचा फोटो घरांत लावल्यापासून आतां कांहीं कमी नाहीं. अर्थात् माझ्या सुखाकरतां बाबा माझ्या घरांत येऊन बसले असें मला खात्रीपूर्वक वाटतें.'

★

## ७ खिशांत रुपया कुठून आला ?

श्री. बापूराव धनाजी शेलटे ( राहणार पांडुरंग–गवळी वाडी, खोली नं. ८, गोपी तलाव, माहीम, मुंबई नं. १६ ) यांनीं ता. ६–११–५३ रोजीं खालील अनुभव सांगितले—

'सुमारें ४ महिन्यांपूर्वी मला बाबांची माहिती झाली. त्यावेळेस माझी मोठी मुलगी प्रमिला ही जुलाबानें बरीच आजारी होती. २।३ दिवसांनीं एका साई–मित्रानें बाबांचा अंगारा दिला. तो मुलीला देतांच तिला बरें वाटलें. त्यामुळें माझी बाबांवर व त्यांचे उदीवर श्रद्धा बसली. ह्याच मुलीला नंतर २।४ दिवसांनीं पुष्कळ ताप आला होता. आम्हीं घाबरून गेलों, पण बाबांची उदी देतांच तिला घाम आला आणि त्यानंतर अजिबात ताप गेला.

'दुसरा अनुभव म्हणजे वरील प्रसंगानंतर थोड्याच दिवसांनीं बाबांचा फोटो आणण्यासाठीं म्हणून बाहेर पडलों. कोटाचे सर्व खिसे चांचपून पाहिले, पण त्यांत पैसे नव्हते. म्हणून मीं दोनच रुपये घरांतून मागून घेऊन माझ्या कोटाच्या खिशांत ठेवले. माझ्या बरोबर श्री. गं. रा. सावे या नांवाचे माझे एक मित्र होते. दुकानांत गेल्यावर मला एक

साईबाबांचा फोटो पसंत पडला,पण त्याची किंमत तीन रुपये होती. आणि मजजवळ फक्त दोनच रुपये होते. तेव्हां एक रुपया माझ्या मित्राजवळ उसना म्हणून मागणें भाग होतें. मला तें कांहीं बरें वाटेना. पण इलाज नव्हता. कारण मला तोच फोटो आवडला व दिरंगाई झाली असती तर कदाचित् तो उठून गेला असता. म्हणून मीं माझ्या मित्राजवळ १ रुपया उसना मागितला. त्यांनीं तो दिल्यावर मीं माझे दोन रुपये घेण्यासाठीं म्हणून खिशांत हात घातला, आणि बाहेर काढला तर दोन ऐवजीं तीन रुपये निघाले ! मला या चमत्काराचा उलगडा होत नाहीं. परंतु असें वाटतें कीं, उसना रुपया घेऊन बाबांचा फोटो घेण्याबद्दल मला जी एक प्रकारची खंत वाटूं लागली ती टाळण्यासाठीं म्हणूनच बाबांनीं हा चमत्कार घडवून आणला असावा. त्यांचें त्यांना माहित. पण तो मित्राचा रुपया त्याच वेळेस त्याचा त्यास परत करण्यांत मला जें समाधान लाभलें तें अपूर्व होय.

'तिसरा अनुभव म्हणजे हा बाबांचा फोटो घरांत आणल्यावर व श्रद्धापूर्वक त्याची पूजा वगैरे केल्यावर माझ्या मोठ्या मुलीस (चि. प्रमिला) एक स्वप्न पडलें. आम्हीं घेतलेल्या फोटोंतल्या बाबांच्या प्रतिमेसारखीच एक व्यक्ति तिच्या स्वप्नांत आली आणि तिला म्हणाली कीं, 'तुम्हीं माझ्या देवळांत या'. नंतर स्वप्नांतच ती बाबांचे पायांचें दर्शन घेण्यास गेली असतां बाबा एकदम गुप्त झाले व नंतर ती जागी झाली. बाबांचे पायांचें दर्शन तिला झालें नाहीं. हें स्वप्न तिनें मला सांगितल्यावर शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घ्यावें व त्यांची क्षमाहि मागावी असें मला वाटूं लागलें. त्याप्रमाणें दोन महिन्यांनीं म्हणजे गुरुवार ता. १।१०।५३ रोजीं मी ऑफिसच्या कांहीं मित्रांसह शिर्डीस बाबांचें दर्शन घेण्यासाठीं आलों. परंतु दैवयोग असा विचित्र कीं, आम्हांस पालखीस हजर राहतां आलें नाहीं. माझ्या मुलीस पडलेलें स्वप्न खरें ठरलें. पालखींत ठेवल्या जाणाऱ्या बाबांच्या पवित्र पादत्राणांना मला हात लावतां आला नाहीं. घरीं आल्यानंतर असा चमत्कार घडूं लागला कीं, दर गुरुवारीं दुपारीं ४ ते ५ च्या दरम्यान अगदीं सुगंध वास (उदबत्ती, चंदन वगैरेचा) घरांत दरवळून जातो व तो मला एकट्यालाच जाणवतो. याचा उलगडा होत नाहीं. पालखीचें दर्शन चुकविल्याची जाणीव बाबा या प्रसंगानें तुला देत आहेत, असें माझ्या कांहीं मित्रांनीं सांगितल्यावरून मी माझ्या ऑफिसमधील एका साईभक्ताबरोबर पुन्हां शिर्डीस ता. ५।११।५३ रोजीं आलों. व गुरुवार व्यवस्थित पार पाडून बाबांच्या पालखीचें व त्यांच्या पवित्र पादत्राणांचें दर्शन घेतलें. हें सर्व बाबांनींच करवून घेतलें व ते अशीच कृपा करोत हीच त्यांचे चरणीं माझी नम्र प्रार्थना.'

★

## ८ उदी हें सर्वोत्तम औषध ठरलें

**श्री.** आत्माराम नारायण लाड (घर नं. १००८, आगरवाडा, सायन, मुंबई नं. २२) यांनीं ता. ६-११-५३ रोजीं खालील अनुभव सांगितले—

'माझी बहीण ही सासरीं बाळंतीण झाली, मुलगी जन्मतःच अशक्त निपजली.

सहा महिन्यांची झाली तरी प्रकृतींत कांहींच सुधारणा झाली नाहीं. तेव्हां या मुलीला घेऊन ती आमचेकडे आली. आम्हांला त्या मुलीकडे पाहवेना. कारण तिची तब्येत इतकी खराब होती कीं, कातडी लोंबत होती व हातापायाच्या अक्षरशः काड्या झाल्या होत्या. सर्वांनींच तिची आशा सोडली होती. मी नुकताच (१९५२ मध्यें) शिर्डीहून बाबांचें दर्शन घेऊन आलों होतों. बरोबर बाबांची उदी आणली होती. उदीप्रभावाच्या गोष्टी ऐकल्या होत्या. तेव्हां बाबांनाच वैद्य करून व त्यांचेवर सर्व भार टाकून त्यांची उदी हेंच औषध मुलीस द्यावयाचें आम्हीं ठरविलें. त्याप्रमाणें तिला २ वेळेला तेलांत थोडी उदी टाकून त्या तेलानें मालीश करण्यास सुरवात केली. तसेंच तोंडांतहि थोडीशी उदी तिला देत असूं. ह्या उपायामुळेंच तिची प्रकृति झपाट्यानें सुधारली आणि आज इतपत सुधारणा आहे कीं, आतां अंगापिंडानें ती आपल्या वयाइतकी तरी दिसते. तिचें आजचें वय १॥ वर्षांचें आहे आणि तिची प्रकृति सुधारत आहे. केवळ बाबांच्या कृपेमुळेंच आणि त्यांच्या उदीमुळेंच तिला हा गुण आला, यांत आम्हांला तर कांहीं शंका वाटत नाहीं.

### अनन्यभावाचा नवस फळाला आला

'सुमारें वर्षभर मला नोकरी नव्हती. फार मानसिक त्रास झाला. माझ्या मावस-बहिणीच्या यजमानानें मला १९५३ च्या सुरवातीस शिर्डीस बाबांचे दर्शनास आणलें. बाबांच्या दर्शनाचा हा दुसऱ्यांदां लाभ घडला. मी शिर्डीस २ दिवस होतों. अनन्यभावानें मी त्यांचें स्मरण करी. त्यांना कळकळून प्रार्थना केली कीं, कसेंहि करून मला नोकरीस लावा. नवस वगैरे मीं कांहीं केला नाहीं. परंतु प्रार्थना मात्र अगदीं अंतःकरणपूर्वक केली. घरीं परतल्यावर सेंच्युरि प्रिंटिंग प्रेसमध्यें लगेच नोकरीचें बोलावणें आलें. तेथें २ महिने नोकरी केली. परंतु नोकरी खाजगी स्वरूपाची होती. सरकारी नोकरी मिळावी ही इच्छा. आजकाल सहज सरकारी नोकरी मिळणें किती कठीण आहे हें सर्वांस माहितच आहे. माझी आई व बहीण या मे १९५३ मध्यें शिर्डीस बाबांचे दर्शनास आल्या होत्या. त्यावेळेस बाबांपाशीं माझ्या नोकरीबद्दल बोलण्यास मीं तिला सांगितलें होतें. त्याप्रमाणें ती बाबांच्या समाधीजवळ बोलली. नंतर ६ दिवसांनीं परत आली. तों सेंट्रल रेल्वे प्रेसमध्यें माझ्याजोगती एक नोकरी आहे असें मला एका ओळखीच्या इसमानें सांगितलें व त्यानेंच पुढें सर्व माहिती देऊन व खटपट करून मला नोकरीस लावून दिलें. ही सर्व बाबांचीच कृपा होय व त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.'

★

## ९ बाबांनीं दिलेला दृष्टांत

श्री. वसंतराव हरिश्चंद्र पाठारे (रावसाहेब नगरकर यांची वाडी, धरमदास रोड, बाबई, बोरिवली, पश्चिम रेल्वे) यांनीं आपणांस बाबांची माहिती प्रथमच कशी झाली व त्यांचा स्तवन-मंजरीचा प्रसाद कसा मिळाला, तसेंच श्रीसाईसच्च-

रित्राचें पारायण केल्यामुळें आर्थिक संकटांतून मुक्त होऊन पुढें कसें कल्याण झालें याबद्दलचे अनुभव ता. १४-११-५३ रोजीं सांगितले; ते खालीं दिले आहेत—

'मी रेल्वे नोकर आहें. १९४५ मध्यें माझी आर्थिक स्थिति अगदींच सामान्य होती. तशांत प्रारब्धाच्या फेऱ्यांत सापडून मी आजारी पडलों. लवकर बरा होईना. कर्ज काढून औषधपाणी करणें भाग पडलें. दीर्घ कालानंतर मी बरा झालों; आणि कर्जाचें ओझें शिरावर बसलें. नोकरीच्या उत्पन्नांतून जेमतेम संसार चालवीत होतों; तेव्हां कर्ज कसें फिटणार? मी दत्तभक्त आहें व दर गुरुवारीं दत्ताची आरती करतों. साधारण १९५१ मध्यें केव्हांतरी आमचे एक मित्र श्री. निळकंठ चिमणाजी घाणेकर यांनीं मला सांगितलें कीं गुरुवारची जी दत्ताची आरती तुम्हीं करतां त्याबरोबरच साईबाबांची पण आरती म्हणत चला. नंतर त्यांनीं बाबांची माहिती दिली व मी तेव्हांपासून दर गुरुवारीं 'आरती साईबाबा' हीहि आरती म्हणूं लागलों.

'अशा रीतीनें बाबांच्या भक्तीस मी लागल्यावर १९५१ च्या गणेशचतुर्थीस माझे एका मित्राजवळ मीं 'श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी' हें पुस्तक पाहिलें. तेव्हां त्या मित्रास मीं त्याबद्दलची माहिती विचारली. त्यानें त्या स्तोत्राची माहिती दिल्यावर ही पुस्तिका मजजवळ असावी व आपण ती दर गुरुवारीं वाचावी असें मला अत्यंत तीव्रतेनें वाटलें व मी त्या मित्रास तें पुस्तक देण्यास विनंती केली. त्यानें स्पष्ट नकार दिला. पण मीं अत्यंत आग्रह करतांच त्यानें दिली आणि त्याच दिवशीं मीं संपूर्ण वाचून काढली. सबंध वाचून होतांच मला आश्चर्य वाटलें. कां कीं, 'मंजरी' गणेश-चतुर्थीच्या पुण्यदिवशींच दासगणूंनीं लिहून पूर्ण केली आणि अशी ती प्रसादपूर्वक पोथी मला गणेशचतुर्थीच्या दिवशींच मिळाली. मला हा एक बाबांचा प्रसादच वाटला व आतां बाबा आपलीं संकटें दूर करतील असा विश्वास उत्पन्न झाला. हा विश्वासच पुढें कल्याणप्रद ठरला.

'ही प्रासादिक स्तवनमंजरी मिळाल्यानंतर कर्जाचा बोजा अगदींच हळूहळू कां होईना पण निश्चित कमी होऊं लागला. अशा स्थितींत १९५२ मधील श्रावणांतल्या शेवटच्या आठवड्यांतील गोष्ट. श्री. घाणेकरांनीं मला श्रीसाईसच्चरित्राचें पारायण करण्याबद्दल सुचाविलें. त्याप्रमाणें मीं लगेच पोथी मागवून घेऊन पोथींत दिलेल्या सूचनेप्रमाणें विधीपूर्वक पारायण केलें. पारायण झाल्यावर श्री. घाणेकरांनीं मला विचारलें कीं, बाबांचा कांहीं दृष्टांत वा अनुग्रह तुम्हांस झाला काय? मीं नाहीं म्हटलें. परंतु मनांत माझ्या खुटखुटत असे कीं, बाबांनीं आपणांस कांहींच कसा दृष्टांत दिला नाहीं. पारायण संपल्यानंतरच्याच गुरुवारची गोष्ट. मी जेवून पलंगावर अर्धवट झोंपलों असतां एक साधू आला व त्यानें बाहेरूनच म्हटलें कीं, 'कोणी साईभक्त मला जेऊं घालील का?' श्री. घाणेकरांचे शब्द माझ्या लक्ष्यांत होते, म्हणून मीं त्या साधूंना हांक मारली आणि कुटुंबास सांगून त्यांना जेवणास घातलें. त्यांनीं हात वगैरे धुतले आणि नंतर साईबाबांच्या फोटोकडे लक्ष्य गेल्यावर ते म्हणाले कीं, 'मी पण

साईभक्त आहे.' मग त्यांनीं माझे हातावर चिमूटभर पिंजर (कुंकु) ठेवली व हात बंद करण्यास सांगितलें. नंतर त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी व माझी पत्नी बाबांच्या फोटोसमोर गेलों व नमस्कार करून परत आलों. हा वेळपावेतों मूठ बंदच होती. नंतर त्यानें मूठ उघडण्यास सांगितलें, तेव्हां तेथें आम्हांस कुंकु न दिसतां तांदूळ दिसले. आम्हीं आश्चर्यानें अगदीं भारावून गेलों. ते तांदूळ मीं नंतर जपून ठेवले; व आज बाबांच्या समाधीस दाखवून पुन्हां परत नेत आहें.

'नंतर त्या साधूनीं गळ्यांतील रुद्राक्षांच्या माळा हलवून त्यांतून गंगा काढली व तीर्थ म्हणून तें आम्हांस दिलें; आणि आशिर्वाद दिला कीं, 'तुझें कल्याण होईल व तुझ्या मनांतील इच्छा पूर्ण होतील.' त्यांच्या स्वतःबद्दल माहिती विचारतां ते म्हणाले, 'मी शिर्डीच्या लेंडीबागेंतून आलों. तूंहि शिर्डीस लवकरच येशील. त्यावेळेस मला एक कपडा घेऊन ये.' नंतर ते निघून गेले.

'हा अनुभव आम्हांस जबरदस्त होता. आम्हीं सर्वच अगदीं भारावून गेलों होतों म्हटल्यास हरकत नाहीं. आतां प्रत्यक्ष प्रचीतीची वाट पहात होतों. आणि त्याप्रमाणें एक एक अनुकूल घटना घडूं लागल्या. १९५२ च्या भाद्रपदांतीलच गोष्ट. ते साधू येऊन गेल्याला २–३ दिवस झाले असतील नसतील इतकेंच. आमच्या घरांत भाद्रपद शु॥ ४ स गणपतीची स्थापना होते. ही स्थापना माझे वडील बंधूंच्या घरीं होते व मी खर्चाप्रीत्यर्थ २५ रुपये देत असतों. परंतु यावेळेस मजजवळ अजिबात पैसे नव्हते. त्यामुळें रुखरुख लागून राहिली. तोंच कोणा एका मित्राचें मीं एक काम केव्हांतरी केलें होतें त्या कामाचा मोबदला म्हणून त्यानें कांहीं एक रक्कम मला त्याच वेळेस दिली व त्यामुळें मला बंधूंस २५ रु. देतां आले. आणि त्याच क्षणापासून मी आर्थिक संकटांतून मुक्त होऊं लागलों.

'दुसरी एक माझी मनीषा होती. आमचें लग्न झाल्यावर २ वर्षांनीं आम्हांस एक मुलगा झाला पण त्यानंतर गेल्या १८ वर्षांत कांहींच मूलबाळ झालें नाहीं. अनेकांना दाखवून व उपाय करून स्वस्थ बसलों होतों. आतां बाबांवर श्रद्धा बसल्यामुळें त्यांचेवरच सर्व भार टाकला आणि म्हटलें कीं, ही आमची इच्छा जर पूर्ण झाली तर आम्ही आपले दर्शनास येऊं. त्याप्रमाणें बाबांनीं खरोखरच आमचेवर अनुग्रह केला. माझे कुटुंबास सध्यां ५ वा महिना चालू आहे. हा तर साक्षात् अनुभव आल्यामुळें आम्ही शिर्डीस बाबांचे दर्शनास येण्याची तयारी केली. त्याप्रमाणें ता. २०–११–५३ रोजीं आम्हीं प्रथमच शिर्डीस आलों. नंतर बुधवारीं बाबांचे समाधीस कपडा अर्पण केला. अशा रीतीनें अत्यंत समाधानानें आतां आम्हीं परत जात आहोंत. मी आतां आर्थिक काळजींतून मुक्त झालों असून बाबांच्या कृपेनें थोडाबहुत उत्कर्षहि होत आहे. आतां मला कोणत्याहि प्रकारची चिंता नाहीं. ही सर्व बाबांचीच लीला व त्यांचीच कृपा होय यांत शंका नाहीं.'

★

## १० सव्वा आण्याचा चमत्कार

श्री. ग. र. आराध्ये, शिर्डी, यांचा अनुभव :—

'मला श्रीसाईबाबांची कांहींच माहिती नव्हती; आणि तरीहि त्यांनींच जवळजवळ मला येथें खेचून आणलें. मी २० जून १९५२ रोजीं येथें आलों. त्यानंतरच्या दसऱ्याची हकीगत.

'दसऱ्याच्या उत्सवाच्या अगदीं पहिल्या दिवसाचीच गोष्ट. त्या दिवशींचा पहिलाच प्रमुख कार्यक्रम भिक्षेचा होता. त्या कार्यक्रमास हजर राहणें अवश्य होतें. घरांत मोरी नसल्यामुळें मीं सार्वजनिक बाथरूममध्यें स्नान उरकलें आणि हळूहळू घरीं आलों. जिना चढून वर येतों तों भिक्षेची मिरवणूक समाधि-मंदिरांतून निघून द्वारकामाईकडे जाण्यासाठीं वळली सुद्धां. मला घाई झाली आणि तसाच खोलींत जाऊन टॉवेल सोडला आणि धुतलेला पायजमा घातला (बाकीचे कपडे अगोदरच बदलले होते.) व तसाच ताबडतोब निघालों. पण या एवढ्या श्रमानें भरभर चालणें अशक्य झालें व त्यामुळें मिरवणुकीची व माझी गांठ चावडीच्या पुढेंच पडली. मिरवणुकींत ५।६ भिक्षेकरी होते. बाबा भिक्षा मागत असत त्याची आठवण म्हणून ही पद्धत चालू होती. पण मला हें सर्व नवीनच होतें. कोणी गहूं, तांदूळ, ज्वारी तर पैसा, आणा, रुपया वगैरे झोळींत टाकीत. ज्याच्या झोळींत ही भिक्षा टाकली जाई त्याला 'बाबा' समजूनच लोक नमस्कार करीत. हें सर्व पाहून आपणहि कांहीं तरी भिक्षा टाकावी म्हणजे प्रत्यक्ष बाबांनाच नमस्कार करण्याची संधी आपणांसहि मिळेल असें मला वाटूं लागलें. म्हणून मीं सदऱ्याच्याच खिशांत हात घातला, पण कांहीं निघालें नाहीं. एका हातांत पेन्सिल आणि दुसऱ्या हातांत वही याशिवाय त्यावेळेस मजजवळ कांहींच नव्हतें. पायजमा तर धुतलेला होता. त्यांत काय सांपडणार? म्हणून मीं तिकडे लक्ष्यच दिलें नाहीं. मिरवणूक पुढें जात होती आणि भिक्षेचीं दृश्यें मी पहात होतों. मनाला चुटपुट लागली आणि त्या भरांत माझ्या नकळतच माझा हात पायजम्याच्या खिशांत गेला. आणि काय आश्चर्य! त्या खिशांत एक आणा सांपडला! माझा आनंद काय वर्णावा? ताबडतोब मीं तो बाबांच्या झोळींत टाकला आणि नमस्कार केला. मला फार मोठें समाधान लाभलें, पण तें अल्पकालच टिकलें. कारण मिरवणूक पुढें एस्. टी. मोटार स्टँडकडे आल्यावर तेथें झालेल्या एका संवादानें माझ्या मनांत खळबळ उडवून दिली.

'स्टँडजवळील एका हॉटेलपाशीं बांकावर मी विसाव्यासाठीं बसलों होतों. तेवढ्यांत तेथील एकजण बाबांच्या झोळींत भिक्षा टाकण्यासाठीं गेला. परत आल्यावर दुसऱ्या माणसानें त्यास विचारलें कीं, 'किती पैसे टाकले रे?' त्यानें उत्तर दिलें कीं, 'एक आणा.' 'हात वेड्या! अशी पूर्ण दक्षिणा कधीं देऊं नये. नेहमीं अपूर्ण द्यावी. १। आणा, १। रुपया वगैरे क्रमानेंच दक्षिणा देतात. अरे ही भिक्षा नव्हे. तूं काय भिक्षा वाढणार? ही दक्षिणाच मागणें आहे एक प्रकारची. जा आणि पटकन

दिडकी टाक.' तो मनुष्य तावडतोब गेला आणि त्यानें झोळींत पैसा टाकला. हा वेळ पावेतों मिरवणूक सगुण मेरू नाईकच्या घराकडे गेली होती. हा संवाद ऐकून माझें मन अस्वस्थ झालें. आपणहि एक दिडकी त्या झोळींत आणखी टाकली पाहिजे असें वाटूं लागलें. परंतु आतांपर्यंतच्या चालण्याच्या श्रमानें व उन्हानें आणि सतत धापेनें मी अगदीं थकून गेलों होतों; बांकावरून उठण्याचेंहि त्राण नव्हतें. तर घरीं जाऊन दिडकी आणून ती झोळींत टाकण्याचें कसें जमणार? मीं अगदीं निराश झालों आणि हळू हळू चालूं लागलों. मला वाटत होतें कीं, एक आणा सांपडला हा बाबांचाच चमत्कार व त्यांचीच लीला. पण आतां वाटूं लागलें, कशाचा चमत्कार! त्या पायजम्यांत अगोदरच एक आणा असेल आणि तो धुतांना काढला गेला नाहीं. मीं बाबांना म्हटलें, 'बाबा जर खरोखर आपली मजवर कृपा असेल तर मी घरीं जाऊन तुमच्या झोळींत दिडकी टाकीपर्यंत मिरवणूक विसर्जन पावूं देऊं नका.' कशाचें काय? मी मंदिराच्या पायऱ्यांजवळ आलों तों मिरवणूक विसर्जन होऊन लोकहि निघून गेले. मी मग तसाच खोलीवर गेलों. दम्याचा त्रास आणि त्यांत ही निराशा. त्यामुळें माझा चेहरा अतिशय उदास झाला. माझी पत्नी म्हणाली, 'इतके उदास कां दिसतां?' मीं सर्व हकीगत सांगितली. त्यावर माझी पत्नी म्हणाली, 'अहो, बाबांनीं तुमची इच्छा पूर्ण केली कीं!' कसें काय म्हणून विचारतां ती पुढें म्हणते, 'आतां थोड्या वेळांपूर्वी आपला अरविंद आला आणि ती मिरवणूक गॅलरींतून पाहूं लागला. तो म्हणाला कीं, आपणहि कांहीं भिक्षा घालूं. मीं त्याला म्हटलें, घाल एक आणा. पण तोच म्हणाला कीं, आपण गरीब आहोंत, मी दिडकीच टाकतों. आणि मंदिराच्या रस्त्यावरील पायऱ्यांजवळ मिरवणूक आली आणि त्यानें तेथेंच झोळींत एक दिडकी टाकली. मीं समक्ष पाहिलें. तुमची बाबांच्या झोळींत आणखी एक दिडकी टाकण्याची इच्छा पूर्ण झाली व बाबांनीं चमत्कारहि दाखवला.'

'हें सर्व ऐकल्यावर माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि कृतज्ञतेनें डोळे भरून आले. ही बाबांची लीला ज्या ज्या वेळेस मला आठवते त्या त्या वेळेस अत्यंत निराश स्थितींतसुद्धां आशेचा दीप मला दिसूं लागतों, हीच बाबांची कृपा.'

~~~~~~~~\*\*~~~~~~~~

\* तैसा हृदयामध्यें मी राम। असतां सर्व सुखाचा आराम।
तरी भ्रांतांसी काम। विषयांवरी॥

—**ज्ञानेश्वरी**, अध्याय ९, ओंवी ६०
~~~~~~~~

# श्रीस्वामी विवेकानंदांनीं सांगितलेली



# श्रीरामाची कथा



★

प्राचीन काळीं अयोध्या नगरींत दशरथ नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या राजाला तीन राण्या होत्या. पण त्याला मूलबाळ नव्हतें. राजानें पुत्रप्राप्तीसाठीं अनेक उपाय केले. पुढें त्याला चार मुलगे झाले. त्यांत राम हा सर्वांत वडील. पूर्वरीतीप्रमाणें राजानें आपल्या चारी पुत्रांस सर्व प्रकारच्या विद्येंत व कलेंत निष्णात केलें. आपल्या पाठीमागें राज्याबद्दल आपल्या पुत्रांत तंटेभांडणें होऊं नयेत म्हणून राजे लोक आपल्या देखतच वडील पुत्रास राज्याभिषेक करीत असत. हा अभिषेक झाल्यानंतर त्या पुत्रास ' युवराज ' म्हणजे तरुण राजा ही पदवी प्राप्त होई. या रीतीप्रमाणें दशरथ राजानें आपल्या वडील मुलास यौवराज्य देण्याची तयारी केली.

त्या वेळीं आर्यावर्तांत जनक नांवाचा एक राजा होता. त्याला सीता या नांवाची एक अत्यंत लावण्यवती कन्या होती. सीतेची उत्पत्ति पृथ्वीपासून झाली होती. जमीन नांगरतेवेळीं जो तास पडतो त्याला जुन्या संस्कृत भाषेंत सीता असें नांव आहे. उत्पत्तीचे नाना प्रकार जुन्या दंतकथांतून वर्णिलेले आहेत. कोणा एखाद्याची उत्पत्ति केवळ पुरुषापासून होत असे; एखाद्याची मानवी आईबापांवांचून होत असे; कोणाचा जन्म यज्ञांतील अग्नीपासून झाल्याचें वर्णन आढळतें. तसेंच आणखी एखादा मेघांतून अवतरला असेंहि कुठें कुठें वर्णन आहे. भारतीय पुराणग्रंथांतून अशा प्रकारच्या अनेक कथा गोंवल्या असल्याचें तुम्हांला आढळून येईल. सीता ही पृथ्वीची कन्या असल्यामुळें अत्यंत पवित्र होती. तिला जनक राजानें वाढविलें होतें. ती उपवर झाली तेव्हां जनक राजानें तिच्या विवाहाची तयारी केली.

हिंदुस्थानांत पूर्वी स्वयंवराची चाल होती. स्वयंवराचे वेळीं देशोदेशींचे राजे व राजपुत्र येत असत. आणि मुलगी त्यांपैकीं एखादा पसंत करीत असे. हातांत पुष्पमाला घेऊन सभामंडपांत राजकन्या फिरत असे; व तिजबरोबर तिची सखी फिरून, ती तिला प्रत्येक राजाबद्दल माहिती सांगत असे. राजकन्येस एखादा वर पसंत पडला म्हणजे तिनें आपल्या हातांतील माळ त्याच्या गळ्यांत घालायची व नंतर विवाहसमारंभ मोठ्या थाटानें व्हावयाचा अशी चाल असे.

सीतेला वरण्यासाठीं पुष्कळ राजकुमार उत्सुक होते. सभा भरल्यावर तेथें हरधनु नांवाचें एक प्रचंड धनुष्य आणून ठेवलें. जो कोणी तें धनुष्य मोडील त्यालाच सीता माळ घालील, असा पण केलेला होता. पुष्कळ राजपुत्रांनीं तें धनुष्य मोडण्यासाठीं आपली सर्व शक्ति खर्च केली. पण त्यांच्यानें तें धनुष्य भंगवलें नाहीं. शेवटीं रामानें तें धनुष्य उचललें आणि सहज लीलेनें मोडून टाकलें. नंतर दाशरथि राम आणि जानकी यांचा विवाहसमारंभ मोठ्या आनंदानें साजरा करण्यांत आला.

आपल्या पत्नीला घेऊन राम राजधानीस परत आल्यावर त्याला यौवराज्याचा अभिषेक करण्याची तयारी दशरथ राजानें केली. समारंभाची संपूर्ण तयारी झाली होती आणि सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता. इतक्यांत रामाची सावत्र आई कैकेयी हिनें त्या साऱ्या आनंदांत विरजण घातलें. पूर्वी एके वेळीं राजा दशरथानें तिला दोन वर देऊं केले होते. पण त्यावेळीं ते तिनें मागून घेतले नव्हते. तिला त्या वरांचें स्मरणहि राहिलें नव्हतें. पण तिच्या एका दासीनें तें स्मरण तिला यावेळीं करून दिलें आणि ते वर मागून घेण्याबद्दल तिला सुचविलें. ती दासी अत्यंत दुष्ट स्वभावाची होती. कैकेयीचा भरत नांवाचा मुलगा होता. त्याला यावेळीं यौवराज्याभिषेक करून घेण्याबद्दल तिनें कैकेयीचें मन वळविलें. तिनें नानाप्रकारच्या गोष्टी कैकेयीला सांगून तिच्या मनांत भयंकर मत्सर उभा केला. कैकेयी मत्सराग्नीनें जळूं लागल्यावर 'एका वरानें भरतास यौवराज्याभिषेक आणि दुसऱ्यानें रामाला चौदा वर्षें वनवास' असें मागून घे, असें त्या दासीनें तिला सांगितलें.

राम हा दशरथ राजाचा अगदीं जीव कीं प्राण होता. कैकेयीचें मागणें त्याच्या कानावर पडतांच वज्राघात झाल्याप्रमाणें त्याची स्थिति झाली. वचनभंग करण्याला त्याचें मन घेईना आणि इकडे रामाला त्याला दूर करवेना. एकीकडे आड व दुसरीकडे विहीर अशी त्याची अवस्था झाली. पण त्याच्या या स्थितींतून रामानें त्याची मुक्तता केली. राम स्वतःच वनवासास जाण्यास तयार झाला. पित्यानें वचनभंग करावा यापेक्षां आपणच वनवास पत्करावा हें अधिक बरें, असा निश्चय करून तो वनवासास गेला. त्या वेळीं त्याची पत्नी सीता व धाकटा भाऊ लक्ष्मण हीं दोघें त्याच्याबरोबर गेलीं.

या काळीं आर्यावर्तांतील भयंकर अरण्यांतून अनेक जातीचे मूळचे रानटी लोक राहात असत. त्यांजबद्दल आर्यांस फारशी माहिती नसे. याच रानटी लोकांपैकीं एका जातीस त्यांनीं वानर असें नांव दिलें होतें. त्याचप्रमाणें या जातीपैकीं जी एक अत्यंत बलाढ्य जात होती तिला त्यांनीं राक्षस असें नांव दिलें होतें.

राम, लक्ष्मण आणि सीता हीं ज्या वनांत गेलीं, त्यांत वानर आणि राक्षस यांची बरीच वस्ती होती. सीता रामासह जावयास निघाली तेव्हां राम तिला म्हणाला, 'तूं सुखांत वाढलेली राजकुमारी; भयप्रद असा अरण्यवास तुला कसा

सहन होईल ?' सीतेनें उत्तर दिलें, ' जेथें राम तेथें सीता. आतां माझें राजकुमारीपण नष्ट झालें आहे. आतां जी स्थिति आपली तीच माझी.' रामाला यानंतर तिचें मन मोडवलें नाहीं. सीता त्याच्याबरोबर अरण्यांत गेली. याप्रमाणें सीता, राम व लक्ष्मण अशीं तिघें वनवासाला निघालीं व यमुना नदीच्या किनाऱ्यापर्यंत गेलीं. यमुनातीरावर एक पर्णकुटी बांधून त्यांनीं तिथें वस्ती केली. रानांतील फळें जमा करून व हरणें वगैरे वनपशूंची शिकार करून तीं आपला उदरनिर्वाह करूं लागलीं. अशा रीतीनें कित्येक दिवस लोटल्या-वर एक राक्षसी त्या ठिकाणीं आली. लंकेचा राजा रावण याची ती बहीण होती. रावणाची बहीण त्या ठिकाणीं इकडे तिकडे फिरत असतां सहजगत्या राम तिच्या नजरेस पडला. त्याचें तें मदनाला लाजविणारें रूप पाहून ती अगदीं मोहित झाली. परंतु राम हा अत्यंत पवित्र वर्तनाचा आणि एकपत्नीव्रत पाळणारा असल्यामुळें त्यानें तिच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. हा अपमान तिला सहन न होऊन ती आपल्या बंधूकडे गेली व त्याजपाशीं तिनें सीतेच्या अलौकिक रूपाचें वर्णन केलें.

राम हा अत्यंत शूर म्हणून प्रसिद्ध होता. त्यावेळच्या राक्षसांपैकीं कोणीहि त्यास जिंकण्यास समर्थ नव्हता. रावणालाहि याची जाणीव होती. याकरतां रामाला जिंकून सीता मिळविणें शक्य नव्हतें. म्हणून कांहीं युक्ति योजून सीतेला हस्तगत करण्याचा त्यानें बेत केला. त्यानें दुसरा एक राक्षस आपल्या मदतीस घेतला. हा राक्षस मायावी विद्येंत फार प्रवीण होता. त्यानें सुंदर हरणाचें रूप धारण केलें आणि रामाच्या पर्णकुटीजवळ जाऊन तो त्या रूपानें इकडे तिकडे वागडूं लागला. त्या हरणाचें तें मनोहर रूप पाहून सीतेला फार हर्ष झाला आणि त्याला धरून आणण्यासाठीं तिनें रामाची विनवणी केली. त्यास धरण्याकरतां रामहि ताबड-तोब त्याच्या पाठीमागें गेला. जातांना त्यानें





लक्ष्मणास सीतेच्या संरक्षणाकरतां म्हणून मागें ठेवलें. लक्ष्मणानें झोंपडीभोंवतीं अग्नीचें एक वर्तुळ तयार केलें आणि सीतेला म्हटलें, ' आज कांहींतरी संकट येणार असें मला वाटत आहे. यासाठीं या वर्तुळा-बाहेर न येण्याची खबरदारी घ्या. याच्या बाहेर तुम्ही आल्यास तुमच्यावर काय प्रसंग ओढवेल तें सांगवत नाहीं.' इकडे रामाचा बाण त्या हरिणास लागतांच त्याचा एकदम राक्षस होऊन तो मरून पडला !

त्याच वेळीं ' लक्ष्मणा धांव ' असा करुणस्वर झोंपडींत बसलेल्या सीतेला ऐकूं

आला. तो ऐकून सीता फार घाबरून गेली. ती लक्ष्मणाला म्हणाली, 'भावोजी हा त्यांचाच शब्द आहे. आपण लवकर त्यांच्या मदतीला जा.' लक्ष्मणानें उत्तर दिलें, 'हा खचित रामाचा स्वर नव्हे.' पण सीतेनें फार विनविल्यामुळें त्याला नाइलाजानें जावें लागलें. लक्ष्मण थोडासा दूर जातो न जातो तोंच रावण भिकाऱ्याच्या रूपानें झोंपडी-जवळ आला आणि कांहीं दान करण्यासाठीं सीतेची प्रार्थना करूं लागला. सीता म्हणाली, 'थोडा वेळ थांब. घरांतील पुरुष बाहेर गेले आहेत. ते आले म्हणजे तुला भिक्षा घालीन.'

भिकारी म्हणाला, 'मला इतकी भूक लागली आहे कीं आतां माझ्यानें दम धरवत नाहीं. तुमच्याजवळ जें काय असेल तेवढेंच मला पुरें.'

सीतेजवळ थोडीं रानफळें मात्र काय तीं शिल्लक होतीं. तीं: फळें सीता त्यास देऊं लागली. तेव्हां तो म्हणाला, 'बाई, आणखी थोड्या पुढें येऊन तीं फळें मला द्या. माझ्या नजीक येण्यास तुम्ही अनमान करूं नका. मी साधु आहें.' त्याला तीं फळें देण्याकरतां सीतेला त्या अग्निवर्तुळाबाहेर जावें लागलें. ती बाहेर येतांच त्या भिकाऱ्यानें आपलें विशाल राक्षसी स्वरूप धारण केलें आणि सीतेला उचलून झपाट्यानें तो तेथून निघून गेला. बिचारी सीता! तिला त्यावेळीं साहाय्य देण्यास जवळ कोणीच नव्हतें. रावण तिला घेऊन जात असतां तिनें आपल्या अंगावरील अलंकार काढून वाटेंत ठिकठिकाणीं टाकून दिले.

सीतेला घेऊन रावण निघाला तो थेट लंकेंत आला. आपल्याला सीतेनें वरावें म्हणून तो तिची मनधरणी करूं लागला. त्यानें अनेक प्रकारें तिची समजूत घालण्याचा आणि उंची वस्त्राभरणांनीं तिला मोह पाडण्याचा प्रयत्न केला. परंतु सीतादेवी पातिव्रत्याची केवळ मूर्ति होती. तिनें रावणाबरोबर भाषण सुद्धां केलें नाहीं अथवा त्याच्याकडे पाहिलेंहि नाहीं. तिच्या या वर्तनानें क्रोधाविष्ट होऊन रावणानें अखेर तिला अशोकवनांत नेऊन ठेवलें आणि आपली राणी होण्याचें कबूल करीपर्यंत तिला निवाऱ्याच्या जागीं आणूं नये असा त्यानें सक्त हुकूम देऊन ठेवला.



इकडे राम व लक्ष्मण पर्णकुटिकेंत परत येऊन पाहतात तों सीता तेथें नाहीं. त्यामुळें दोघेहि शोकाकुल झाले. सीतेचें काय झालें असावें याचा तर्क कुणालाच करतां येईना. दोघेहि झोंपडींतून बाहेर पडून अरण्यांत तिचा शोध करीत फिरूं लागले. पण तिचा मागमूसहि कोठें लागेना. फिरतां फिरतां त्यांना एका ठिकाणीं कांहीं वानर आढळले. त्यांत हनुमान् नांवाचा एक श्रेष्ठ वानर होता. हनुमान् हा दैवी प्रकृतीचा वानर असून तो तेथील वानरांचा अधिपति होता. सीतेला मुक्त करण्याच्या कार्यांत यानेंच रामाला मोठी मदत केली.

रामाच्या ठिकाणीं त्याची निष्ठा इतकी प्रबळ होती कीं, खरा भक्त कसा असावा याचें उदाहरण सांगतांना लोक हनुमानाचें नांव घेऊं लागले.

वानरांनीं रामाला सांगितलें, 'आकाशमार्गानें एक रथ जातांना आपण पाहिला.



त्या रथांत एक राक्षस आणि एक अत्यंत रूपवती स्त्री शोक करीत होती. रथ इकडून गेला तेव्हां तिनें एक दागिना खालीं टाकला. तो हा पहा.' असें म्हणून त्यांनीं एक रत्नहार दाखविला. लक्ष्मणानें तो हातीं घेऊन म्हटलें, 'हा दागिना माझ्या ओळखीचा नाहीं.' रामानें तो ओळखून म्हटलें, 'होय, खरोखर हा सीतेचाच अलंकार आहे.'

सीता ही लक्ष्मणाची वडील भावजय असल्यामुळें आर्यपद्धतीप्रपाणें तिच्या मुखाकडे पाहणें हें अयुक्त असें लक्ष्मणास वाटत होतें. त्यामुळें तिच्या गळ्यांतील अलंकार त्याला ओळखतां आला नाहीं. आर्यांच्या प्राचीन रीतिरिवाजांतील हा एक नमुना आहे.



नंतर त्या वानरांनीं तो राक्षस कोण व कोठें राहणारा याविषयीं सगळी माहिती रामाला सांगितली व ते सर्व मिळून त्याच्या शोधाकरतां निघाले.

त्या काळीं वानरांचा एक राजा वाली या नांवाचा होता. त्याचें व त्याचा भाऊ सुग्रीव याचें राज्याच्या बाबतींत युद्ध सुरू झालें होतें. रामानें सुग्रीवाचा पक्ष स्वीकारून त्याला मदत करण्याचें आश्वासन दिलें. सुग्रीवाचें राज्य बळकावून वालीनें त्याला हद्दपार केलें होतें. वालीचा वध करून रामानें सुग्रीवाला त्याचें राज्य पुन्हां मिळवून दिलें. नंतर या सर्व वानरांच्या साहाय्यानें रामानें सीतेचा शोध सुरू केला. शेवटीं हनुमान् समुद्र उल्लंघून लंका बेटांत गेला. आणि तेथें सीतेचा शोध करीत हिंडूं लागला.

रावणानें सर्व देवांना व दानवांना जिंकून आपल्या बंदीशाळेंत घातलें होतें व शेंकडों रूपवती स्त्रिया धरून आणून त्यांस त्यानें आपल्या भोगपत्नी करून ठेवल्या होत्या. त्यांच्या रंगमहालांतून हनुमान् हिंडला. अखेर त्याच्या मनांत आलें कीं, सीता अशा ठिकाणीं कदापि राहणार नाहीं; अशा जागीं येऊन पडण्याचा प्रसंग आल्यास ती खचित प्राणत्याग करील. हा विचार सुचतांच तो तेथून निघून दुसरीकडे गेला. शेवटीं अशोकवनांत एका वृक्षाखालीं सीता बसली असल्याचें त्याला दिसलें. ती अत्यंत कृश झाली होती व दुःखानें व्याकुळ झालेली होती. हनुमानानें

सूक्ष्म रूप धारण केलें व तो त्या वृक्षावर बसून राहिला. अनेक राक्षसिणी येऊन सीतेचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत होत्या. पण सीतेनें त्यांच्याकडे ढुंकूनंहि पाहिलें नाहीं.

त्या राक्षसिणी दूर गेल्यावर हनुमान झाडावरून खालीं उतरला व सीतेजवळ येऊन म्हणाला, 'मी रामाचा दूत असून त्यानेंच मला आपला शोध करण्यासाठीं पाठविलें आहे.' असें म्हणून बरोबर आणलेली रामाची आंगठी त्यानें तिला दाखविली. तो पुढें म्हणाला, 'आपण कुठें आहांत याची बरोबर माहिती मिळाली म्हणजे मोठें सैन्य घेऊन राम येईल व रावणास जिंकून आपणांस सोडवून नेईल. तथापि आपली मर्जी असेल तर आपण माझ्या खांद्यावर बसावें म्हणजे एकाच उडींत समुद्र उल्लंघून मी आपणांस रामाकडे घेऊन जाईन.' सीतेनें या म्हणण्यास रुकार दिला नाहीं. ती निःसीम पतिव्रता होती. परक्या पुरुषाचा स्पर्शहि तिला सहन करवला नसता. तिनें आपल्या आंगावरील एक भूषण काढून तें हनुमानाजवळ दिलें व तें घेऊन तो परत आला.

हनुमानाकडून सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर रामानें मोठें सैन्य जमा केलें व तो दक्षिणेस जावयास निघाला. समुद्रापर्यंत आल्यावर लंकेस जाण्यासाठीं त्यानें समुद्रावर एक मोठा पूल बांधला. त्याचें सेतुबंध हें नांव अद्यापि चालू आहे.

पुलाचें काम पुरें झाल्यावर वानरांचें सर्व सैन्य घेऊन राम-लक्ष्मण लंकेवर चाल करून गेले. कित्येक दिवस घनघोर युद्ध सुरू होतें. त्यांत रक्ताच्या नद्या वाहिल्या. रामानें शेवटीं रावणास जिंकून त्याचा वध केला व त्याची राजधानी हस्तगत केली. रावणाचा बिभीषण नांवाचा एक भाऊ होता. त्यास रामानें लंकेच्या गादीवर बसविलें. नंतर सीतेला बरोबर घेऊन राम आपल्या अनुयायांसह लंका सोडून परत आला.

वनवासाची चौदा वर्षे संपूर्ण झालीं तेव्हां रामाचा धाकटा भाऊ भरत त्याला येऊन भेटला व दशरथ मृत्यु पावल्याचें वृत्त त्याला कळवून राज्याचा स्वीकार करण्याविषयीं तो रामाला पुनः पुनः सांगूं लागला. राम वनवासात असतांहि भरतानें सिंहासनाचा स्वीकार केला नव्हता. त्यावेळीं रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून तो स्वतः प्रतिनिधि म्हणून कारभार पाहात होता. भरताच्या आग्रहावरून राम अयोध्येला आला व त्याच्या आणि प्रजाजनांच्या संमतीनें सिंहासनारूढ झाला.

कांहीं दिवस गेल्यानंतर सीतेच्या पवित्रतेबद्दल लोकांत कुजबुज सुरू झाली. रावणाच्या घरीं असतां ती शुद्ध राहिली याबद्दल तिनें दिव्य करून खात्री पटविली पाहिजे असें लोक म्हणूं लागले. राम म्हणाला, 'सीता म्हणजे पावित्र्याची केवळ मूर्ति. तिला दिव्य कशाला पाहिजे?' परंतु लोक अगदीं हट्टास पेटून तिनें दिव्य केलेंच पाहिजे



असें म्हणूं लागले. प्रजाजनांचा संतोष राखणें हा रामाचा बाणा होता. त्यानें लोकांच्या म्हणण्याप्रमाणें एक अग्निकुंड तयार करवून त्यांत अग्नि पेटविला व सीतेनें त्यांत उडी घेतली. आतां काय होणार या उत्कंठेनें सर्वजण पाहातात तों सिंहासनावर बसलेल्या सीतेला घेऊन स्वतः अग्निदेव प्रकट झाला. हें दिव्य पाहून सर्व लोक आनंदित झाले व सर्व राज्यभर प्रजाजन सीतेला धन्यवाद देऊं लागले.

रामानें आपणांस राज्याभिषेक करून घेतला तेव्हां



त्यावेळच्या रीतीप्रमाणें त्यानें राज्यशासनाच्या बाबतींत कांहीं शपथा घेतल्या होत्या. प्रजाजनांचा सदैव संतोष राखणें हें राजाचें प्रथम कर्तव्य आहे असा समज त्या काळीं होता. राजे लोकहि जनमतास अत्यंत मान देत, व स्वतःस प्रजेचे सेवक समजत. सीतेच्या सहवासांत रामचंद्राचा सुखाचा कांहीं काळ लोटल्यावर तिच्याबद्दल लोकांत पुन्हां कुरकुर सुरू झाली. राक्षसानें पळवून नलेल्या सीतेचा रामानें त्याग केला पाहिजे असें लोक म्हणूं लागले.

लोकांचीं मनें राखण्याकरतां रामानें सीतेचा त्याग करून तिला वनांत पाठविलें. त्या वनांत वाल्मीकि ऋषि राहात होते. दुःखानें व्याप्त व अत्यंत निराश झालेली अशी ती सीता त्या ऋषींच्या नजरेस पडली. तिची सर्व हकीकत ऐकून घेऊन त्यांनीं तिला आपल्या आश्रमांत नेलें. सीता त्यावेळीं गरोदर होती. ती यथाकालीं प्रसूत होऊन तिला दोन आवळेजावळे मुलगे झाले. त्यांचें लालनपालन वाल्मीकि ऋषींनीं केलें. स्वतःच्या कुलाबद्दल वगैरे कोणत्याहि प्रकारची माहिती त्या दोघां मुलांना दिलेली नव्हती. वाल्मीकि ऋषींनीं रामायण लिहिलें व त्यावरून एक नाटकहि लिहिलें.

नाट्य आणि संगीत या कला भारतवर्षांत पवित्र मानल्या जातात. संगीत हा पांचवा वेदच होय अशी म्हण हिंदुस्थानांत आहे. एखादें प्रीतीचें अथवा दुसरें कसलेंहि गाणें असो, तें गात असतां गायक जर त्याशीं तल्लीन होऊन गेला तर त्याला मोक्ष मिळतो; त्याला जपतपादि दुसरीं साधनें कोणतींच नकोत; ध्यानादि साधनांनीं जें कांहीं प्राप्त करून घ्यायचें तें तो गाण्यानें मिळवितो, असा आमचा समज आहे.



वाल्मीकि ऋषींनीं रामचरिताचें वर्णन तयार करून तें रामाच्या मुलांना—लव-कुशांना-शिकविलें.

मोठमोठ्या राजांनीं अनेक प्रकारचे यज्ञ करण्याची चाल भारतांत पूर्वकाळीं होती. त्या चालीला अनुसरून रामानेंहि एक यज्ञ करण्याची तयारी केली. पण पत्नीशिवाय कोणताहि यज्ञ सांग होऊं शकत नाहीं. सहधर्मचारिणीशिवाय यज्ञ पूर्ण व सशास्त्र होत नाहींत.

रामानें यज्ञ आरंभिला तेव्हां सीता वनवासांतच होती. तेव्हां रामानें पुन्हां लग्न करावें अशी सूचना कोणी कोणी केली. पण एकपत्नीव्रत रामानें ती सूचना मान्य केली नाहीं. त्यानें सीतेची सुवर्णप्रतिमा तयार करवून घेतली व या प्रतिमेची योजना सहधर्मचारिणीच्या जागीं करण्यांत आली. याच समारंभांत एका नाटकाची योजना करण्यांत आली होती. यज्ञसमारंभासाठीं वाल्मीकि ऋषि आपल्या लव आणि कुश या शिष्यांसह आले होते. लव आणि कुश हे रामाचे पुत्र आहेत हें कोणालाहि ठाऊक नव्हतें.



यज्ञमंडपांत एक रंगभूमि तयार करण्यांत आली होती. राम, त्याचे बंधू, दरबारी लोक व इतर प्रजाजन मिळून फार मोठा लोकसमुदाय नाटक पाहण्यासाठीं जमला होता. वाल्मीकि ऋषींच्या सांगण्यावरून लव आणि कुश यांनीं रामचरिताचें गाणें म्हणण्यास प्रारंभ केला. त्यांच्या सुरूपतेनें व गानसौंदर्यानें सारी सभा तटस्थ होऊन गेली होती. स्वतःच्या चरित्राचें पठण ऐकत असतां राम अगदीं तल्लीन होऊन गेला. शेवटीं सीतेच्या त्यागाचा भाग आला तेव्हां त्याला शोक अनावर झाला. त्याची ती अवस्था पाहून वाल्मीकि ऋषि त्याला म्हणाले, 'रामा, असा बेहोष होऊं नकोस, मी तुला सीतेची भेट करवितों.' मग त्यांच्या आज्ञेप्रमाणें सीता पुढें आली व रामाला भेटली. राम–सीतेची भेट होत असतां सभेंत निराळीच तक्रार सुरू झाली. सीतेनें दिव्य केलें नाहीं असें कांहीं लोक पुन्हां बोलूं लागले. लोकांच्या या दुष्टपणानें दुःखित होऊन सीता म्हणाली, 'हें पहा मी दिव्य करीत आहें.' असें म्हणून तिनें पृथ्वीमातेला हांक मारली. तात्काळ पृथ्वी दुभंग झाली व सीतेनें आपल्या मातेच्या उदरांत अखेरचा प्रवेश केला. सीता अशा रीतीनें गुप्त झालेली पाहतांच सर्व लोक भयचकित होऊन गेले. रामाच्या दुःखाला तर पारावार राहिला नाहीं.

सीता गुप्त झाल्यानंतर रामचंद्राकडे देवांचा दूत आला व म्हणाला, 'महाराज, आपला येथील कार्यभाग संपला आहे. आतां आपण पुन्हां वैकुंठास चलावें.' हें भाषण ऐकतांच रामचंद्राला आपल्या मूलरूपाचें स्मरण झालें. त्यानें अयोध्यातीरावरील शरयू नदींत जलसमाधि घेतली.